**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन( अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

५८

## महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१११४/प्र.क्र.४०/एसएम- २

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक: २६ फेब्रुवारी, २०१४

वाचा -

१) **शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.**

२) **शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१३/६०४५४/१५-क(५)/१२०१९, दिनांक २४ डिसेंबर, २०१३.**

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक **असणा**-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ०८ ऑगस्ट,२०१३ पर्यंत अर्ज मागविण्यात

NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune Reg No. SFS-1114 Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ३७०० प्रस्तावांपैकी खालीलप्रमाणे एकूण २२१७ प्रस्तावांना याद्वारे शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | वर्गीकरण | पात्र प्रस्ताव | अपात्र प्रस्ताव | एकूण प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन शाळा मान्यतेचे प्रस्ताव | १८०४ | १३२५ | ३१२९ |
| २ | शाळा दर्जावाढीचे प्रस्ताव | ४१३ | १५८ | ५७१ |
| एकूण | | २२१७ | १४८३ | ३७०० |

**१.१ नवीन शाळा परवानगी व शाळांचा दर्जावाढ** - या सोबतच्या **विवरणपत्र- अ** मध्ये दर्शविलेल्या शाळांना, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन **परवानगी** देत आहे.

**१.२.अपात्र शाळा-** नवीन शाळा स्थापन करणे किंवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे यासाठी अपात्र ठरलेल्या प्रस्तावांच्या तपशीलासह संबंधित जिल्ह्याच्या छाननी समितीच्या सदस्य-सचिवांकडून संबंधित अर्जदार संस्थेला वैयक्तिरित्या कळविण्यात येईल .

२. शासन परवानगी/**शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती** -

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.**

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी** देण्यात येत आहे.

अ) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.



MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune Reg No. SFS-1114 Dt. 26/02/2014 NMVKP'S

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

ब) ज्या व्यवस्थापनास सन २०१४-१५ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

क) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना

i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच,

ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा**- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,



MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune Reg No. SFS-1114 Dt. 26/02/2014 NMVKP'S

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०२२८११२४०१९९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2014.03.01 11:46:12 +05'30'

**(रा.ग.गुंजाळ)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. विभागांतर्गत सर्व संचालक.
९. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१०. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
११. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.



NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL
Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune
Reg No. SFS-1114
Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

१२.संबंधित प्रशासन अधिकारी, महानगर पालिका/नगर परिषद/नगर पालिका

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

२. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव.

३. मा. मुख्य सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक

४. सर्व सहसचिव / उपसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

५. निवडनस्ती (एसएम २).

NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL
Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune
Reg No. SFS-1114
Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 193 | पुणे | पळसनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, पळसदेव, ता.इंदापूर, जि.पुणे | श्री पळसनाथ प्राथमिक विद्यालय, पळसदेव, ता.इंदापूर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 194 | पुणे | महाराष्ट्र आरोग्य मंडळ, माळवाडी, हडपसर, पुणे-28 | डॉ. दादा गुजर इंग्लिश मिडीयम स्कूल, महंमदवाडी, हडपसर, पुणे-60 | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 195 | पुणे | कर्मवीर शिक्षण संस्था रुई, ता.इंदापूर, जि.पुणे | श्री बाबीर इंग्लिश मिडीयम स्कूल, रुई, ता.इंदापूर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 196 | पुणे | सुरज फौंडेशन, कुपवाड, ता.मिरज, जि.सांगली | सुरज फौंडेशन इंग्रजी माध्यम स्कूल, मुढवा, पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 197 | पुणे | मोरे एज्युकेशन सोसायटी, चिखली, पुणे | श्रीमती हौसाबाई नारायण मोरे इंग्लिश मिडीयम स्कूल, मोरेवस्ती, चिखली, पुणे-62 | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 198 | पुणे | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले संस्था,चिचवड, पुणे-19 | डी.बी.निंबारकर इंग्लिश मिडीयम स्कूल, मोहननगर, चिंचवड, पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 199 | पुणे | श्री. संत शिरोमणी तुकाराम महाराज प्रतिष्ठान झारगडवाडी, ता.बारामती, जि.पुणे | संत तुकाराम महाराज प्राथमिक विद्यालय, डोर्लेवाडी, ता.बारामती, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | मराठी | पात्र |
| 200 | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठान, पुणे-30 | प्राथमिक विद्यालय, घोटवडे फाटा पिरंगुट, ता.मुळशी, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 201 | पुणे | भाग्यमथुरा शिक्षण मंडळ, कुंजीरवाडी, ता.हवेली, जि.पुणे | मुक्ताई मेमोरिअल स्कूल, कुंजीरवाडी, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 202 | पुणे | जैद पाटील एज्युकेशन सोसायटी,चिंबळी, ता.खेड, जि.पुणे | शांताई मेमोरिअल स्कूल, काळेचीवाडी, ता.खेड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 203 | पुणे | पुरंदर टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर, पुणे | पुणे केंब्रिज पब्लिक स्कूल, धनकवडी, पुणे-43 | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी - मराठी | पात्र |
| 204 | पुणे | गुंजवणी शिक्षण संस्था, हातवे, ता.भोर, जि.पुणे | विजयादेवी इंग्लिश स्कूल, हातवे बु., ता.भोर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |
| 205 | पुणे | श्री वाघेश्वर ग्रामविकास प्रतिष्ठाण, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे | नामदार श्री शरदचंद्र पवार पब्लिक स्कूल, मांडवगण फराटा, ता.शिरुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी | पात्र |



NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL
Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune
Reg No. SFS-1114
Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 2040 | पुणे | एस पी देशमुख शिक्षण संस्था चाकण ता खेड | विद्या निकेतन इंग्लिश मेडी. स्कूल चाकण ता. खेड | नवीन शाळा | उच्च माध्यमिक. | इंग्रजी | पात्र |
| 2041 | पुणे | महात्मा ज्योतिबा फुले एज्युकेशन ट्रस्ट खेड | S. N. G. ज्यु.कॉलेज काटोरे वस्ती ता.खेड | नवीन शाळा | उच्च माध्यमिक. | मराठी | पात्र |
| 2042 | पुणे | रयत शिक्षण संस्था सातारा | एस.एम. जोशी कॉलेज हडपसर पुणे 28 | नवीन शाळा | उच्च माध्यमिक. (सायन्स) | इंग्रजी | पात्र |
| 2043 | पुणे | रयत शिक्षण संस्था सातारा | एस.एम. जोशी कॉलेज हडपसर पुणे 28 | नवीन शाळा | उच्च माध्यमिक. (कॉमर्स) | इंग्रजी | पात्र |
| 2044 | पुणे | श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ मोई ता. खेड | उच्च माध्यमिक विद्यालय, (कला वानिज्य विज्ञान) चिंबळी ता.खेड | नवीन शाळा | उच्च माध्यमिक. | मराठी | पात्र |
| 2045 | पुणे | सुर्यदत्ता एज्युकेशन फौन्डेशन सदाशिव पेठ पुणे 3 | ज्यु कॉलेज बावधान.ता.मुळशी | नवीन शाळा | उच्च माध्यमिक. (CBSE) | इंग्रजी | पात्र |
| 2046 | पुणे | पुणे महानगर पालिका पुणे. | राजीव गांधी ज्यु कॉलेज सहकार नगर पुणे | नवीन शाळा | उच्च माध्यमिक. | इंग्रजी | पात्र |
| 2047 | पुणे | सुर्यदत्ता एज्युकेशन फौन्डेशन बावधन ता.मुळशी | सुर्यदत्ता पब्लीक स्कूल बावधान ता.मुळशी | नवीन शाळा | उच्च माध्यमिक. | इंग्रजी | पात्र |
| 2048 | पुणे | श्री शेलारमामा मेमोरीयल सोसायटी पुणे | सह्याद्रि इंग्लिश मेडी. स्कूल मेदनकरवाडी ता.खेड | नवीन शाळा | उच्च माध्यमिक. | इंग्रजी | पात्र |
| 2049 | पुणे | ॲग्रिकल्चर डेव्हलपमेन्ट ट्रस्ट बारामती ता.बारामती | शारदाबाई पवार विद्यानिकेतन शारदानगर ता.बारामती | दर्जावाढ | उच्च माध्यमिक (कला) | मराठी | पात्र |
| 2050 | पुणे | ॲग्रिकल्चर डेव्हलपमेन्ट ट्रस्ट बारामती ता.बारामती | शारदाबाई पवार शारदानगर ता.बारामती | दर्जावाढ | उच्च माध्यमिक (वानिज्य) | मराठी | पात्र |
| 2051 | पुणे | ॲग्रिकल्चर डेव्हलपमेन्ट ट्रस्ट बारामती ता.बारामती | शारदाबाई पवार विद्यानिकेतन शारदानगर ता.बारामती | दर्जावाढ | उच्च माध्यमिक (विज्ञान) | मराठी | पात्र |
| 2052 | पुणे | प्रगतीपथ एज्युकेशन फौऀन्डेशन ट्रस्ट कर्वेनगर पुणे | मिल्लेनियम नॅशनल स्कूल कर्वेनगर पुणे | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 2053 | पुणे | अलीश मेमोरीयल एज्युकेशन ट्रस्ट लोणावळा ता.मावळ | रायवूड इन्टरनॅशनल हायस्कूल लोणावळा ता.मावळ | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 2054 | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठाण नवी पेठ पुणे 3 | उच्च माध्यमिक विद्यालय वाशेरे ता.खेड | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2055 | पुणे | शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठाण बावडा ता.इंदापूर | एस.बी.पाटील ज्यु कॉलेज वनगळी ता.इंदापूर | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 2056 | पुणे | सितारंग चॅरिटेबल ट्रस्ट बोरी बु ता.जुन्नर | जगदंबा उच्च माध्यमिक विद्यालय, बोरी बु (जाधववाडी) ता.जुन्नर | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |



NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL
Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune
Reg No. SFS-1114
Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम | छाननी समितीची शिफारस व त्या बाबत प्राप्त झालेल्या हरकती / सूचना / आक्षेप विचारात घेता शासनाचा अंतिम निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 2057 | पुणे | अमर एज्युकेशन सोसा. धनकवडी पूणे 43 | ज्ञान प्रसारक उच्च माध्यमिक विद्या मंदिर आंबेगांव पठार पुणे 46 | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2058 | पुणे | पुना शिक्षण संस्था कावेरीनगर थेरगांव पुणे 46 | महर्षि विद्या मंदिर ज्यु कॉलेज काळवाडी पुणे 17 | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 2059 | पुणे | पुना शिक्षण संस्था कावेरीनगर थेरगांव पुणे 46 | श्रीम.सावित्रीबाई रामेश्वर पाल ज्यु कॉलेज श्रीनगर रहाटणी पुणे 17 | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | हिंदी | पात्र |
| 2060 | पुणे | गुंजवणी शिक्षण संस्था हातवे बू ता.भोर | श्री काशिनाथराव खुटवड माध्य व उच्च माध्य.विद्या. हातवे खुर्द ता.भोर | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2061 | पुणे | किलबिल एज्युकेशन सोसा. जनवाडी पुणे | किलबिल उच्च माध्य.विद्या पिंपळे गुरव पुणे | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 2062 | पुणे | त्रिमुर्ती शिक्षण संस्था कर्वेनगर पुणे | वाघेश्वर इंग्लिश ज्यु कॉलेज वाघोली ता.हवेली | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 2063 | पुणे | अरविंद एज्युकेशन सोसा. शितोळे नगर सांगवी पुणे 27 | लिटिल फ्लॉवर ज्यु कॉलेज शितोळे नगर सांगवी पुणे 27 | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 2064 | पुणे | दौंदे शिक्षण प्रसारक मंडळ दौंदे ता.खेड | भैरवनाथ उच्च माध्यमिक विद्यालय दौंदे ता. खेड | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2065 | पुणे | गुरुकूल शिक्षण संस्था पुनावळे ता.मुळशी | श्रीम.अनूसाई ओव्हाळ उच्च माध्य.विद्या पुनावळे ता.मूळशी | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2066 | पुणे | ज्योतिबा एज्यु सोसायटी बिरदवाडी ता.खेड | बाबूराव पवार ज्यु कॉलेज बिरदवाडी, चाकण ता. खेड | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2067 | पुणे | अहूरा एज्युकेशन सोसा गोखलेनगर पुणे 16 | मुसळे सायन्स ज्यु कॉलेज कोंढवा पुणे 48 | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | इंग्रजी | पात्र |
| 2068 | पुणे | सरस्वती प्रतिष्ठाण भोर ता. भोर | क्रां.वा.ब.फडके स्मृती विद्यालय रावडी ता.भोर | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2069 | पुणे | रयत शिक्षण संस्था सातारा | कालीकामाता उच्च माध्यमिक विद्यालय वाघाळे ता.शिरुर | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2070 | पुणे | जनहित प्रतिष्ठाण बारामती | जनहित प्रतिष्ठाण ज्यु कॉलेज बारामती | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2071 | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठाण नवी पेठ पुणे 3 | माध्यमिक विद्यालय, उरवडे ता.मुळशी | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |
| 2072 | पुणे | दि कॉन्फरन्स ऑफ चर्चेस ख्राईष्ट इंन वेन्टन इंडीया बारामती | बोरी हायस्कूल बोरी ता.इंदापूर | दर्जावाढ | उच्च माध्यमिक | मराठी | पात्र |



MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL, Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune, Reg No. SFS-1114, Dt. 26/02/2014 N.M.V.K.P.'S

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

महाराष्ट्र शासन
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.१३२/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ ऑक्टोबर, २०१६

संदर्भ -

शिक्षण संचालक(माध्यमिक व उच्च माध्यमिक),पुणे यांचे पत्र क्रमांक-अमाशा/स्वयंअर्थ/२०१६/१६-१७/३०१/४७२९, दिनांक ११.८.२०१६

<u>प्रस्तावना</u> -

१. उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठाण, सदाशिव पेठ,पुणे,३० या संस्थेच्या २ शाळांना महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता नवीन शाळा स्थापन करण्यास अथवा विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर झाले आहेत. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सोबतच्या सहपत्रामधील २ शाळा सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास खालील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळांनी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे <u>बंधनकारक</u> राहील. तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune Reg No. SFS-1114 Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

(२) सदर शासन निर्णयाच्या सोबतच्या सहपत्रामधील संबधित शाळांच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

क) शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार सीबीएसई मंडळाशी संलग्नेतेकरिता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबधित विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांची राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा

NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune Reg No. SFS-1114 Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा. ग. गुंजाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक),पुणे
७. निवडनस्ती (एसएम-२)

NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL
Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune
Reg No. SFS-1114 Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

| महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन), अधिनियम,2012 अंतर्गत कलम 7(1) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी सन 2016-17 या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी दिलेल्या शाळांच्या नावांची यादी | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-1016/प्र.क्र.132/एसएम-2, दिनांक 17 ऑक्टोबर,2016 चे सहपत्र** | | | | | | | |
| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | नवीन शाळा /दर्जावाढ | शाळेचा प्रकार | मंडळ संलग्नता | माध्यम |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| १ | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठाण, सदाशिव पेठ,पुणे,३० | प्राथमिक विद्यालय, घोटावडे फाटा, ता.मुळशी, जि.पुणे | दर्जावाढ | प्राथमिकला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | राज्य मंडळ | इंग्रजी |
| २ | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रीडा प्रतिष्ठाण, सदाशिव पेठ,पुणे,३० | प्राथमिक विद्यालय, किरकटवाडी, ता.हवेली, जि.पुणे | दर्जावाढ | प्राथमिकला जोडून उच्च प्राथमिक (इयत्ता ६ वी ते ८ वी) | राज्य मंडळ | इंग्रजी |

NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL
Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune
Reg No. SFS-1114
Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१७/प्र.क्र.२९०/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १ जुलै, २०१७

संदर्भ- शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/स्वयंअर्थ/२०१६/१६-१७/३०१/२११०, दिनांक,२२.५.२०१७

प्रस्तावना -

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यामान शाळेचा दर्जावाढ करण्यास परवानगी देण्याबाबत चे प्रस्ताव शासनास सादर झाले आहेत. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेले खालील प्रस्ताव पात्र ठरत असल्यामुळे या प्रस्तावास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठाण, नवी पेठ, पुणे | मामासाहेब मोहोळ मेमोरियल स्कूल, पिरंगुट, ता.मुळशी, जि.पुणे | दर्जावाढ | उच्च प्राथमिक शाळेस जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी राज्यमंडळ) | इंग्रजी |
| २. | पुणे | नामदेवराव मोहोळ विद्या व क्रिडा प्रतिष्ठाण, नवी पेठ, पुणे | सिद्धार्थ मोहोळ मेमोरियल किरकटवाडी, ता.हवेली, जि.पुणे | दर्जावाढ | उच्च प्राथगिक शाळेस जोडून माध्यगिक (इयत्ता ९ वी ते १० वी राज्यमंडळ) | इंग्रजी |

NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune Reg No. SFS-1114 Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

२.२ अटी व शर्ती -

(१) सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींची व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणा-या सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(२) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करुन या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(३) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील

(४) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(५) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

(६) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन यु-डायस क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी

NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL
Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune
Reg No. SFS-1114 Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL

म्हणून घोषित केले आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(७) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शालेय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे
६. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद (प्राथमिक/माध्यमिक), पुणे
७. निवडनस्ती (एसएम २)

NMVKP'S MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL
Pirangut, Tal. Mulshi, Dist. Pune
Reg No. SFS-1114 Dt. 26/02/2014

Principal
MAMASAHEB MOHOL MEMORIAL SCHOOL